# <u>हसू-आसू</u>

पायाखालची ही वाट ओळखीची
झाकते तीही काट्यांना धुळीखाली
कळेना कधी ते पायांना बोचती
असेल का छद्मीपणे हसत ती ?

कळीदार कोवळी ही फुलवेल
गंधित सुगंधे तिचा भोवताल
खुडू जाता परी सुवासिक फुल
रुतता करी काटा का ती हसेल ?

झुळझुळ सरीतेचे जळ शुध्द
पुरवी जरी धावे ती अनिर्बंध
नर लोभी परी घाली तिला बांध
फुटता तो ती का असेल हसत ?

असतील सारे हे मनाचे खेळ
हसू तेथे आसू हेच निर्विवाद ||४||

– नारायण
०८/३०/२३